| | |
|---|---|
| MHBI150009732021 | **नियमित दिवाणी दावा क्र.२३०/२०२१ मधील**<br>**निशाणी क्र.५१ वरील आदेश**<br>**कौशल्याबाई डोके वि. मुरलीधर पवार व इतर** |

प्रस्तुतचा अर्ज प्रतिवादी क्र.२ व ३ यांनी त्यांना लेखी कैफीयत दाखल करण्यास झालेला विलंब माफ करुन त्यांची लेखी कैफीयत स्वीकारण्यासाठी दाखल केलेला आहे. वादीने त्याचे म्हणणे अर्जावर नमुद केले आहे.

०२] प्रतिवादी व वादी यांच्या कथनांचे अवलोकन केले. प्रतिवादींच्या कथनाप्रमाणे ते अडाणी व अज्ञानी असून त्यांना कोर्ट कामाची व कायदेशीर बाबींची माहिती नसल्याने तसेच सदर प्रकरणातील महत्वाची कागदपत्रे वेळेत उपलब्ध न झाल्याने व कोरोना काळामुळे ते मुदतीत त्यांची लेखी कैफीयत दाखल करु शकले नाहीत. सदर दावा वाटपाचा असून प्रतिवादींचे महत्वाचे हितसंबंध दाव्यात गुंतलेले आहेत. जर प्रतिवादींची लेखी कैफीयत अभिलेखावर स्वीकारली नाही तर त्यांना त्यांचे कायदेशीर हक्कापासून वंचित व्हावे लागले व त्यांचे कधीही न भरुन येणारे अतोनात नुकसान होईल. सबब, अर्ज मंजुर करण्याची विनंती केली आहे. वादीने अर्ज मंजुर करण्यास तीव्र आक्षेप नोंदविला आहे.

०३] अभिलेखाचे अवलोकन केले असता असे निदर्शनास येते की दावा हा स्थावर मिळकतीबाबत असून प्रतिवादीचे मौल्यवान हक्क त्यामध्ये गुंतलेले आहेत असे त्यांचे कथन आहे. प्रतिवादी क्र.२ व ३ यांना समन्सची बजावणी होऊन ते दिनांक २१.०२.२०२२ रोजी प्रकरणात हजर होऊन देखील त्यांनी मुदतीत आपली लेखी कैफीयत दाखल केली नाही. प्रतिवादींना महत्वाची कागदपत्रे वेळेत उपलब्ध न झाल्याने व कोरोना काळामुळे ते मुदतीत त्यांची लेखी कैफीयत दाखल करु शकले नाहीत. प्रस्तुतचा दावा हा स्थावर मिळकतींबाबत आहे. परिणामी पक्षकारांची मौल्यवान हक्क दाव्यामध्ये समाविष्ट आहेत. तसेच प्रतिवादींच्या विरुध्द निशाणी १ कडे स्पष्टपणे एकतर्फा आदेश पारीत झालेला नाही. परंतु, कैफीयत दाखल करण्यास झालेला विलंब लक्षात घेता प्रस्तुतचा अर्ज विचारात घेण्यायोग्य आहे. झालेल्या विलंबास कोविड-१९ हे कारण नमुद केलेले आहे. प्रतिवादींना संधी दिल्यास वादीचे कोणतेही नुकसान होणार नाही. तसेच प्रतिवादींचा अर्ज वादीला कॉस्ट देण्याच्या अटीवर मंजुर केल्यास वादीला कोणताही उजर राहणार

नाही. दावा अद्यापही पुराव्यास नेमलेला नाही. त्यामुळे दावा पुर्वीच्या स्थितीत जाईल असे नाही. म्हणून सदरचे कारण स्वीकारण्यायोग्य आहे. परिणामी अर्ज कॉस्टवर मंजूर करणे योग्य राहिल. सबब, खालील आदेश.

<u>**आदेश**</u>

१) अर्ज कॉस्ट रक्कम रु.२००/- वादीला देण्याच्या अटीवर मंजूर करण्यात येतो.

२) प्रतिवादी क्र.२ व ३ यांना वादीला रक्कम रु.२००/- कॉस्ट दिल्यानंतर त्यांना लेखी कैफीयत दाखल करण्यास झालेला विलंब माफ करण्यात येऊन त्यांना त्यांची लेखी कैफीयत अभिलेखावर दाखल करण्याची परवानगी देण्यात येते.

Digitally signed by ARTEE ASHOK PATIL
Date: 2022.09.16 11:45:59 +0530

दिनांक - १५.०९.२०२२

(श्रीमती ए.ए.पाटील)
सह दिवाणी न्यायाधीश क.स्तर,पाटोदा

**:: C E R T I F I C A T E ::**

"I affirm that the contents of this PDF file are word to word as per original Judgment/order".

Sd/-
(R.M.Naik)
Steno Grade-III

(a) Dictated on : 15/09/2022
(b) Transcribed on : 15/09/2022
(c) Checked & signed on : 15/09/2022